स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/शै.वि./बारामती रोजगार मेळावा/२०२४/ 882
दिनांक : 22 FEB 2024

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
**पुणे विभागातील सर्व संस्था**

**विषय :- दिनांक ०२ मार्च, २०२४ रोजी बारामती (पुणे) येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याबाबत.**

संदर्भ :- मा.विभागीय आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय येरवडा, पुणे-६ यांचे पत्र क्रमांक : कौविरोवउ/विकापु/बारामती/रोमे/५१४, दि. २१.०२.२०२४.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, दि. २०.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार, राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता तसेच उद्योजकांना आवश्यक कुशल मनुष्यबळ प्राप्त होण्यासाठी नामांकित उद्योजक/इंडस्ट्रिज यांचे समवेत **शनिवार दिनांक ०२ मार्च, २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले आहे.**

यास्तव आपणांस सूचित करण्यांत येते की, आपल्या संस्थेत / महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले अथवा शिक्षण सोडलेले अथवा शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांची नोंदणी महास्वयंम या वेबपोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in) करुन घेण्यात यावी. तसेच महाविद्यालयांमधील प्लेसमेंट कक्षास याबाबतची माहिती देण्यात यावी. सुशिक्षित युवकांना एकाच छताखाली प्राप्त होणा-या रोजगाराच्या संधीचा लाभ आपल्या शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना आपण आपल्या माध्यमातून करुन द्यावा. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन उमेदवारांना महाविद्यालयाच्या बसेसव्दारे सदर रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने आपले संस्था स्तरावरुन उचित व्यवस्था / कार्यवाही करण्यात यावी.

सोबत : संदर्भिय पत्र.

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय
शासकीय बंगला क्र. ११, जेल रोड, येरवडा, पुणे - ४११००६
दुरध्वनी – ०२०-२६६८३६१३
वेबसाईट- www.mahaswayam.gov.in ई मेल- rojgarddpune@gmail.com

क्र.कौविरोवउ/विआपु/बारामती रोमे/ ५१४ /२०२४ दिनांक : २१/०२/२०२४

प्रति,

सहसंचालक,
उच्च व तंत्रशिक्षण, पुणे विभाग

विषय :- विषय :- दि. ०२ मार्च २०२४ रोजी बारामती (पुणे) येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याबाबत.

संदर्भ :- १. मा. आयुक्त,कौ.वि. रो.व उ. आयुक्तालय , नवी मुंबई यांचे पत्र क्र. कौविरोवउआ/कक्ष-८/योजना/प्र.क्र.३/२४/७७५-९६ दि. २५/०१/२०२४

२. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्रमांक:कौविउ- २०२४/प्र.क्र.१४ प्रशा.२ दि.०६ फेब्रुवारी, २०२४.

३. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखालील दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजीची बैठक.

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. २०/०२/२०२४ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता तसेच उद्योजकांना आवश्यक कुशल मनुष्यबळ प्राप्त होण्यासाठी नामांकित उद्योजक/इंडस्ट्रिज यांचे समवेत **शनिवार दिनांक ०२ मार्च २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथे रोजी विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

यास्तव रोजगार मेळाव्यासाठी आपल्या अधिनस्त विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले अथवा शिक्षण सोडलेले अथवा पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच जास्तीत जास्त नोकरीइच्छूक उमेदवारांची नोंदणी महास्वयम या वेबपोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in) करुन घेण्यात यावी. तसेच महाविद्यालयांमधील प्लेसमेंट कक्षास याबाबतची माहिती देण्यात यावी. सुशिक्षित युवकांना एकाच छताखाली प्राप्त होणाऱ्या रोजगाराच्या संधीचा लाभ आपल्या शैक्षणिक संस्थातील विद्यार्थ्यांना आपण आपल्या माध्यमातून करुन द्यावा, **तसेच महाविद्यालयीन उमेदवारांना महाविद्यालयाच्या बसेसव्दारे सदर रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने आपले स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात यावी.**

२१.२.२४

(डॉ चंद्रकांत पुलकुंडवार) भा.प्र.से.
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे